# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 06 April 2025
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – ०६ एप्रिल २०२५ सायंकाळी ६.१०

****

- गेल्या दहा वर्षात केंद्र सरकारनं पायाभूत सुविधांसाठीची अर्थसंकल्पीय तरतुद सहा पटीनं वाढवल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
- इफ्कोच्या संशोधन आणि विकास कार्यामुळे नॅनो युरीया आणि नॅनो डीएपीनं जगभरात भारताची प्रतिमा उजळली – केंद्रीय गृहमंत्री अमित शहा
- भारतीय जनता पक्षाच्या ४५वा स्थापना दिनानिमित्त विविध कार्यक्रम

आणि

- देशभरात रामनवमीचा उत्साह, ठिकठिकाणी शोभायात्रांसह विविध कार्यक्रम

****

गेल्या दहा वर्षात केंद्र सरकारनं पायाभूत सुविधांसाठीची अर्थसंकल्पीय तरतुद सहा पटीनं वाढवल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. तामिळनाडूत रामेश्वरम इथं समुद्रावर बांधलेला भारतातला पहिला व्हर्टीकल लिफ्ट म्हणजेच उभा वर उचलला जाणाऱ्या पंबन रेल्वे पुलाच्या उद्घाटनासह विविध प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी आज पंतप्रधानांच्या हस्ते झाली, त्यानंतर आयोजित जाहीर सभेला ते संबोधित करत होते. देशात पायाभूत सुविधांचं वेगानं काम होत असून, गेल्या दहा वर्षात भारतानं आपली अर्थव्यवस्था दुपटीनं वाढवली असल्याचंही पंतप्रधानांनी नमूद केलं. मुंबईतल्या अटल सेतूसह देशभरात उभारलेल्या पुलांचा त्यांनी यावेळी दाखला दिला, तसंच विविध रेल्वे प्रकल्पांची माहिती दिली.

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

पंबन रेल्वे पुलाच्या उभारणीसाठी साडेपाचशे कोटी रुपयांचा खर्च आला असून, सांध्याचं जोडणीतंत्र वापरून हा पुल उभारला आहे. या नवा रेल्वेपुलामुळे रामेश्वरमची चेन्नईसोबतची दळणवळणीय जोडणी सुधारेल, आणि प्रवासी आणि मालवाहतूकीसह पर्यटन क्षेत्रालाही लाभ होईल, असं पंतप्रधानांनी सांगितलं.

यावेळी त्यांनी या पुलाखालून जाणाऱ्या पहिल्या जहाजाला, तसंच या पुलावरून जाणाऱ्या रामेश्वरम तांबरम एक्सप्रेसला देखील हिरवा झेंडा दाखवला. त्यांनी रामनवमीच्या निमित्तानं रामेश्वरम मंदिरात जाऊन दर्शनही घेतलं. यानंतर रामेश्वरम इथं आयोजित सभेत पंतप्रधानांच्या हस्ते तमीळनाडूमधल्या आठ हजार ३०० कोटी रुपयांच्या रेल्वे आणि रस्ते प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण देखील झालं.

****

इफ्कोच्या संशोधन आणि विकास कार्यामुळे नॅनो युरीया आणि नॅनो डीएपीनं जगभरात भारताची प्रतिमा उजळली असल्याचं, केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. ते आज गांधीनगरमधल्या कलोल इथं इफ्कोच्या सुवर्ण जयंती महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. इफ्कोच्या आधुनिक प्रयोगशाळांतल्या संशोधनाचा फायदा शेतांपर्यंत पोहोचल्याचं त्यांनी सांगितलं. इफ्कोच्या बियाणे संशोधन विभागाचं त्यांनी यावेळी उद्घाटन केलं.

****

भारतीय जनता पक्ष आज आपला ४५वा स्थापना दिन साजरा करत आहे. यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पक्ष कार्यकर्त्यांना शुभेच्छा देतांनाच देशाच्या प्रगतीसाठी अतुलनीय समर्पणाचा संकल्प करत विकसित भारताचं स्वप्न साकार करण्याचं आवाहन केलं. भाजप अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री जगत प्रकाश नड्डा, गृहमंत्री अमित शाह यांनीही पक्ष स्थापना दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

भाजपचा स्थापना दिन नागपूरमध्ये महाल स्थित टिळक पुतळ्याजवळील भाजपा महानगर कार्यालयाच्या भूमिपूजनाने साजरा करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते.

नांदेडमध्ये भाजप स्थापना दिनानिमित्त महानगर भाजप कार्यालयात खासदार अशोक चव्हाण यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आलं. यावेळी खासदार डॉ. अजित गोपछडे, मराठवाडा विभागीय संघटन मंत्री संजय कौडगे, यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

****

पंतप्रधान सूर्यघर योजनेअंतर्गत सौर ऊर्जा कार्यान्वित करणारं परभणी इथलं महावितरण मंडळ कार्यालय राज्यातलं पहिलं महावितरण कार्यालय होत आहे. लवकरच याचा शुभारंभ होईल, अशी माहिती मुंबई इथले कार्यकारी संचालक डी. आर. औंढेकर यांनी दिली. या सोलरची पाहणी केल्यानंतर ते आज बोलत होते.

**बाईट – डी. आर. औंढेकर**

****

रामनवमी आज देशभरात उत्साहात, भक्तिभावाने साजरी होत आहे. यानिमित्त दुपारी १२ वाजता ठिकठिकाणच्या राम मंदीरांसह घरोघरी देखील रामजन्माचा सोहळा साजरा झाला.

अयोध्येतल्या राम मंदिरात आज दुपारी बारा वाजता विशेष किरणोत्सव साजरा करण्यात आला. राम जन्मोत्सवानिमित्त जगाच्या कानाकोपऱ्यातून अयोध्येत आलेल्या भाविकांवर, ड्रोनच्या सहाय्यानं शरयू नदीतल्या पाण्याचा शिडकावा करण्यात आला. याशिवाय आज संध्याकाळी मंदिरात दीपोत्सव साजरा केला जाणार आहे.

****

राज्यात यानिमित्त अनेक ठिकाणी भव्य शोभायात्रा काढण्यात आल्या.

राज्यपाल सी पी राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवी यांनी रामनवमीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान राम हे केवळ एक पूजनीय देवता नाहीत, तर एक राष्ट्रीय प्रतीक असून प्रभू श्रीराम यांनी उपदेश केलेल्या मूल्यांचं पालन आणि जतन केलं पाहिजे, असं फडणवीस यांनी म्हटलं आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनीही रामनवमीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामांच्या आदर्शमय जीवनातून प्रेरणा घेऊन समाजात सौहार्द, सहिष्णुता आणि सत्याची मूल्यं अधिक बळकट करावीत असं आवाहन पवार यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात केलं आहे. तर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी एक श्लोक सामायिक करत सर्वांना रामनवमीच्या शुभेच्छा दिल्या.

****

रामजन्मोत्सवानिमित्त छत्रपती संभाजीनगर शहरातल्या विविध राम मंदिरांमध्ये आज आरती, वाहन फेरी, शोभायात्रा, महाप्रसाद, कीर्तन आदी कार्यक्रम पार पडले. तसंच विविध ठिकाणी गीत रामायणाचं आयोजन करण्यात आलं आहे. गोविंदसिंगपुरा, कैलासनगर, किराडपुरा, समर्थनगर इथल्या राम मंदिरातही विविध कार्यक्रम होत आहेत.

हिंगोली शहरातही आज सकाळी रामनवमी निमित्त भव्य शोभायात्रा काढण्यात आली.

जालना शहरासह जिल्ह्यात श्रीरामनवमी उत्साहात साजरी करण्यात आली. शहरातल्या श्रीराम मंदिरात दिवसभर भाविकांची गर्दी दिसून आली. श्रीराम जन्मोत्सवानिमित्त सायंकाळी शहरातल्या गांधीचमन चौकातून भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. रामदास स्वामींचं जन्मगाव असलेल्या जिल्ह्यातल्या जांबसर्मथ इथंल्या मंदिरातही श्रीराम जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले.

नांदेडमध्ये श्रीराम नवमी निमित्त श्री रेणुका माता मंदिर इथून शोभायात्रा काढण्यात आली. या रॅलीस खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आरतीने सुरुवात करण्यात आली.

नागपुरात श्री पोद्दारेश्वर राम मंदिरातून शोभायात्रा काढण्यात आली. मंदिराच्या प्रांगणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रभू श्रीराम, सीतामाता आणि लक्ष्मणाच्या मूर्तींचं प्रथम पूजन करण्यात आलं.

रत्नागिरी जिल्ह्यातही श्रीराम मंदिरात आज दुपारी पारंपरिक पद्धतीने झालेल्या जन्मोत्सव सोहळ्याला भाविकांनी गर्दी केली होती.

नाशिक इथंही श्री काळराम राममंदिरात रामजन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्याच्या वेळी कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते खासदार संजय राऊत, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आदी उपस्थित होते.

****

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या शिर्डी इथं श्री साईबाबा मंदिरात श्री रामनवमी उत्सवाच्या मुख्य दिवशी आज अखंड पारायण समाप्तीनंतर श्रींचा फोटो, पोथी आणि विणेची मिरवणूक काढण्यात आली. या उत्सवात श्री साईबाबा समाधी शताब्दी स्तंभाच्या ध्वजाचं विधिवत पुजन करुन ध्वज बदलण्यात आला. यानिमित्तानं राज्यातल्या

विविध भाविकांच्या पायी दिंड्या देखील शिर्डीमध्ये दाखल झाल्या आहेत. मंदिर भाविकांसाठी रात्रीही खुलं राहणार असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

नांदेडचं मध्यवर्ती बसस्थानक तात्पुरत्या काळासाठी कौठा मैदानावर स्थानांतरीत करण्यात येत असल्याची माहिती, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली आहे. मध्यवर्ती बसस्थानकाला रेल्वेस्थानकापासून जोडणारा मुख्य रस्ता दुरुस्त करण्यासाठी मर्यादित कालावधीसाठी हा बदल करण्यात आला आहे. या नव्या निर्णयानुसार, १२ एप्रिलपासून जुनं बसस्थानक बंद करण्यात येणार आहे. संबंधित यंत्रणेनं नियोजित वेळेआधीच रस्त्याचं काम पूर्ण करण्याचं आवाहन जिल्हा प्रशासनानं केलं आहे.

****

परभणी इथल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाअंतर्गत सेंटर ऑफ अडव्हान्स एंन्डोस्कोपी सिस्टिम चं उद्घाटन आज खासदार संजय जाधव यांच्या हस्ते झालं. जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ. नागेश लखमावार, वैद्यकीय महाविद्यालयाचे उप अधिष्ठाता डॉ. राजेंद्र अंकुशे यावेळी उपस्थित होते.

****

मागील दोन दिवसांत बीड जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचं आणि फळबागांचं मोठं नुकसान झालं असून, प्रशासनाने तातडीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी आमदार संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

****